# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 62/2023 दिनांक : 10.02.2023**

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**विमानतळ** :-दिनांक 09.02.2023 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **संतोष कनवाड यांचे घराजवळ वसंतनगर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे मुलास जुने भांडणाचे कारणावरून पिस्टलने पोटावर गोळी मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शेख घुडु पि. शेख दस्तगीर, वय 50 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मगदुमनगर नईआबादी, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन **48/2023 कलम** 307,34 भादवि सह कलम 3/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बुरूकुले, मो. नं. 9623652730** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :-

**नांदेड ग्रामीण** :-दिनांक 08.02.2023 रोजी 10.20 वा. चे सुमारास, **सिडको स्मशानभुमीचे रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी फिर्यादी हा ॲटोने राज कार्नर हुन मोंढयाच्या दिशेने निघाला असता ॲटो सिडको स्मशानभुमी कमानी जवळ गेला असता अंदाजे 20 ते 25 वय असलेले तिन अनोळखी इसम अचानक बुलेट मोटार सायकल वर समोरून आले व ॲटो समोर बुलेट मोटर सायकल थांबवुन तिघांनी ॲटो वाल्याला पैशाची मागनी केली व मारहाण केली तसेच ॲटोचे हेडलाईट व काचा फोडले फिर्यादी ॲटोच्या खाली उतरून जात असतांना आरोपीतांनी फिर्यादीस मागुन पकडले व फिर्यादीचे पॅन्टचे खिशातील 7000/- रूपये जबरीने काढुन घेतले फिर्यादीने विरोध केला असता आरोपीतांनी हातातील चाकुने फिर्यादीचे गळयावर वार करून जखमी केले व विट उचलून फिर्यादीस फेकुन मारून जखमी केले. वगैरे **फिर्यादी शेख मैनोद्दीन शेख राजेसाब, वय 44 वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक रा. महाविर चौक, सिडको, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 74/2023 कलम 394,397 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री डाकेवाड, मो.क्रं. 9970096738** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :-

**मुखेड** :- दिनांक 08.02.2023 रोजी 12.30 वा. ते 03.30 वा चे दरम्यान, **फिर्यादी व साक्षीदार यांचे घरामध्ये मौजे उंद्रीपदे ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून कपाटातील व पाण्याच्या टाकीत ठेवलेले सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण 5,05,000/-रूपयेचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी नामदेव शंकरराव गनलेवाड, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. उंद्रीपदे ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 47/2023 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.क्रं. 9130087444** हे करीत आहेत.

## 4)शासकीय कामात अडथळा :-

**माहुर** :- दिनांक 07.02.2023 रोजी 12.15 वा. सुमारास, **मौजे ग्रामपंचायत कार्यालय वानोळा ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून गावात ग्रामसभा चालु असताना फिर्यादीस म्हणाले की फक्त जमा खर्चाचा अहवाल वाचून दाखवत आहेस त्याच्या पावत्या आम्हाला दाखवा असे म्हणु लागल्याने फिर्यादीने त्यांना इस्टीमेट, एम.बी. कामाचा फोटो दाखवित असताना हा खर्च कोनी केला, पैसे कसे उचलेले असे प्रश्न विचारत होते तेव्हा फिर्यादीने त्यांना काम करणारे एजन्सिला दिले असे सांगत असताना फिर्यादीचे अंगावर जावून कॉलर धरून धमकी दिली व ग्रामसभा थांबवुन ग्रामसभेचे उपस्थिती पट हिसकावून घेवून फेकुन देवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी प्रल्हाद ग्यानोबा देवकांबळे, वय 53 वर्षे व्यवसाय नौकरी ग्रामसेवक सज्जा वानोळा रा. आंबुलगा ता. कंधार जि. नांदेड ह. मु. माहुर ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 06/2023 कलम 353,332,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री अण्णासाहेब पवार, मो.क्र. 9923388510** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :-

**किनवट** :- दिनांक 09.02.2023 रोजी 13.40 वा. चे सुमारास, **ग्रामपंचायत कार्यालय समोर मौजे मदनापुर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी दारू किंमती 2000/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दत्तात्रय बाबुराव मामिडवार, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 34/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1913 राठोड, मो.नं. 9767868500** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड